आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२३ जुलै २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प संसदेत सादर, नवीन आयकर प्रणालीचा स्वीकार करणाऱ्यांसाठी आणखी कर सवलतींचा लाभ देण्याची घोषणा
- कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी १ लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद, येत्या पाच वर्षांत एक कोटी युवकांना दरमहा ५ हजार रुपये देणाऱ्या इंटर्नशिप योजनेची घोषणा
- प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात २५ हजार गावं बारमाही रस्त्यांनी जोडली जाणार
- रेल्वेसाठी २ लाख ६२ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद

  **आणि**
- यंदा झालेली नीट-युजी परीक्षा रद्द करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज चालू आर्थिक वर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प लोकसभेत सादर केला. रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योग आणि मध्यमवर्गीयांवर यात विशेष लक्ष देण्यात आलं आहे.

चालू आर्थिक वर्षाचा ४८ लाख २१ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आज त्यांनी सादर केला. या वर्षात ३२ लाख ७ हजार कोटी रुपयांचा महसूल आणि ४ पूर्णांक ९ दशांश टक्के वित्तीय तूट अपेक्षित आहे. या कालावधीत गेल्या आर्थिक वर्षापेक्षा कमी, म्हणजे १४ लाख १ हजार कोटी रुपयांचं कर्ज घेण्याचा सरकारचा मानस आहे.

अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अर्थमंत्र्यांनी लोकसभेत वित्त विधेयक तसंच जम्मू आणि काश्मिर केंद्रशासित प्रदेशाचा ताळेबंद मांडला. त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. त्यानंतर राज्यसभेच्या पटलावर अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प आणि इतर कागदपत्र सादर केली. त्यानंतर राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

<><><><><>

नवीन आयकर प्रणालीचा स्वीकार करणाऱ्यांसाठी आणखी कर सवलतींचा लाभ देण्याची घोषणा सीतारामन यांनी आजच्या अर्थसंकल्पात केली. अतिरीक्त १ लाख रुपयांच्या उत्पन्नाला त्यांनी विद्यमान दरापेक्षा कमी कर आकारणीची घोषणा केली. त्यामुळं पगारदारांना आता साडे १७ हजार रुपये कमी आयकर भरावा लागेल. नवीन कर प्रणालीत ३ लाख रुपयांपर्यंत काहीही कर द्यावा लागणार नाही. ३ ते ७ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना ५ टक्के, ७ ते १० लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १० टक्के, १० ते १२ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना १५ टक्के, १२ ते १५ लाख दरम्यान उत्पन्न असणाऱ्यांना २० टक्के आणि त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना ३० टक्के दरानं आयकर भरावा लागेल.

नव्या पेन्शन योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या लाभांचा आढावा घेणाऱ्या समितीचं काम सुरू आहे. वित्तीय परिस्थिती लक्षात घेऊन नवीन आणि जुनी पेन्शनमधली तफावत दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल, असं त्यांनी आज जाहीर केलं.

<><><><><>

यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी आणि संबंधित क्षेत्रांसाठी १ लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद आहे. मोहरी, भूईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल या तेलबियांच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्यासाठी सरकार योजना आखत आहे. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीत डिजिटल प्रणालीचा वापर करून देशभरातल्या चारशे जिल्ह्यांमध्ये खरीप पिकांचं सर्वेक्षण केलं जाणार आहे.

**<><><><><>**

भविष्य निर्वाह निधी धारकांसाठी विविध सवलतींची घोषणा आज अर्थमंत्र्यांनी केली. त्यानुसार पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्या सर्व नोकरदारांच्या पीएफ खात्यामध्ये एका महिन्याचा पगार जमा होईल. दर महिन्याला एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या सुमारे २१ कोटी युवकांना याचा फायदा होणार आहे.

उत्पादन आणि सेवा क्षेत्रांना चालना देण्यासाठी येत्या पाच वर्षांत देशातल्या आघाडीच्या ५०० कंपन्यांमध्ये एक कोटी युवकांना वर्षभरासाठी इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे. यात त्यांना प्रति महिना ५ हजार रुपये आणि वर्षातून एकदा ६ हजार रुपये दिले जातील, असं सीतारमण यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात यावर्षी ११ लाख ११ हजार १११ कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्र सरकार करणार आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यात २५ हजार गावं बारमाही रस्त्यांनी जोडली जाणार आहेत. पूर नियंत्रणासह बिहार आणि आंध्र प्रदेशासाठी विविध सवलतींची घोषणा अर्थमंत्र्यांनी

केली. ग्रामीण आणि शहरी भागात जमीन सुधारणा आणि व्यवस्थापनसंबंधी नवे नियम लागू करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

**<><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ मध्ये रेल्वेसाठी आतापर्यंतची सर्वाधिक २ लाख ६२ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. रेल्वेच्या एकूण अर्थसंकल्पातल्या १ लाख ८ हजार कोटींपेक्षा जास्त रुपयांची तरतूद सुरक्षे संबंधित कामांसाठी राखीव ठेवण्यात आले असल्याचं त्यांनी दिल्लीत बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**<><><><>**

अर्थसंकल्पात तीन लाख कोटी रुपयांची तरतूद महिला तसंच मुलींसाठीच्या योजनांसाठी आहे. आदिवासीबहुल गावे आणि जिल्हे यांच्या मधल्या आदिवासी कुटुंबांसाठी प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियान सुरु केलं जाईल. त्याचा लाभ ६३ हजार गावं आणि  ५ कोटी आदिवासींना होईल.

**<><><><>**

सोने, चांदी आणि प्लॅटिनमवरच्या करांमध्ये अर्थमंत्र्यांनी आज कपातीची घोषणा केली. त्यानुसार सोन्या, चांदीवर ६ टक्के आणि प्लॅटिनमवर ६ पूर्णांक ४ टक्के आयात शुल्क लागेल. मोबाइल, मोबाइलचे चार्जर, कर्करोगावरील आणखी ३ औषधं, कोळंबी, माशांचे खाद्य वगैरेंवर कर सवलत आज अर्थमंत्र्यांनी जाहीर केली. त्याचवेळी फ्लेक्स बॅनर, दूरसंचार उपकरणे वगैरेंवरचा कर वाढवला.

**<><><><>**

पेपर फुटी आणि गैरप्रकार या कारणांमुळं नीट - युजी २०२४ ही परीक्षा रद्द करायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. सरन्यायाधीशांच्या

अध्यक्षतेखालच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. यंत्रणेतल्या त्रुटीमुळे पेपर फुटले असल्याचा कुठलाही पुरावा नाही. पुनर्परीक्षा घेतली तर २३ लाख विद्यार्थ्यांवर परिणाम होईल आणि शैक्षणिक वेळापत्रक विस्कळीत होईल, असं न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्प हा ग्रामीण, दुर्बल तसंच शेतकऱ्यांना समृद्धीची वाट दाखवणारा आणि युवावर्गासाठी संधी निर्माण करणारा आहे, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली. समाजाच्या प्रत्येक घटकाचा विकास साधणारा असा हा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले.

सामान्य नागरिकांना या अर्थसंकल्पामुळे कोणताही दिलासा मिळालेला नाही. हा अर्थसंकल्प म्हणजे काँग्रेसचा जाहीरनामा आणि मागचे अर्थसंकल्प यांची नक्कल आहे, अशी प्रतिक्रिया लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिली आहे.

२०४७ सालच्या विकसित भारताच्या उद्दिष्टाची पायाभरणी या अर्थसंकल्पातून करण्यात आली असून देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्यासाठीची ही सुरुवात असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

शेतकरी, महिला, युवा आणि गरीब या घटकांना समोर ठेवून केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा भारताच्या भविष्यावर मोठी गुंतवणूक करणारा आहे असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वार्ताहर परिषदेत व्यक्त केलं.

सरकारला पाठिंबा देणाऱ्या राज्यांना या अर्थसंकल्पात भरभरून देण्यात आलं मात्र देशाला सर्वाधिक कर देणाऱ्या राज्याला अर्थसंकल्पात दुय्यम वागणूक दिल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

<><><><>

अर्थसंकल्पाच्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात सकाळपासून घसरण होत होती. अर्थसंकल्प सादर व्हायला सुरूवात झाल्यावर सेन्सेक्स काही वेळेसाठी १ हजार २०० अंकांहून अधिक घसरला होता. त्यानंतर थोड्या वेळासाठी शेअर बाजारात थोडी तेजी झाली. मात्र दिवसअखेर सेन्सेक्स ७३ अंकांची घसरण नोंदवून ८० हजार ४२९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३० अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ४७९ अंकांवर बंद झाला.

<><><><>

महिला आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेत दांबुला इथं आज भारत आणि नेपाळ यांच्यात सामना सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १७ षटकात २ बाद १४४ धावा झाल्या होत्या.

<><><><>

आकाशवाणी मुंबईचा ९७वा वर्धापनदिन आणि भारतीय प्रसारण दिनानिमित्त ‘शब्द सूर हे झंकारती’ या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. आकाशवाणी मुंबईचा वाद्यवृंद, विनोदी कलावंत राहुल वाल्हेकर आणि संगीतकार मिलिंद जोशी यांनी या कार्यक्रमात कलाविष्कार सादर केले.

<><><><>

जल जीवन मोहिमेनं देशभरातल्या ग्रामीण भागातल्या १५ कोटी कुटुंबांना नळाद्वारे पाण्याची जोडण्या देऊन ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. जल जीवन मोहिमेच्या माध्यमातून लोकांना शुद्ध पाणी मिळालं असून त्यांत जीवनमान सुधारलं असल्याचं जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. २०२४ पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्याच्या उद्देशानं २०१९ मध्ये जल जीवन मोहिमेची घोषणा करण्यात आली.